वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत
वस्त्रोद्योग घटकांना व्याज सवलत अनुदान
वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : बैठक - २०१६/प्र.क्र.७९१/टेक्स-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १२ एप्रिल, २०१८

वाचा :- १. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/प्र.क्र.१/टेक्स-२, दिनांक १ मार्च, २०१२
२. शासन परिपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२ / प्र.क्र.१७८/ टेक्स-२, दिनांक १३ ऑगस्ट, २०१२
३. शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण-२०१२/प्र.क्र.२५७/टेक्स-२, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४
४. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांची पत्रे.
५. वित्त विभाग परीपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/४/२०१५
६. शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.बैठक२०१५/प्र.क्र.१२७/टेक्स-५, दि. ८ जून, २०१५,
७. शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण -२०१६/ प्र.क्र.३१ /कोषा.प्रशा-५, दिनांक १० मे, २०१६
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३ दि.०२/०४/२०१८

प्रस्तावना :-

वरील संदर्भीय अनुक्रमांक १ येथील दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS शी निगडीत दिर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजना जाहिर करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत या शासन निर्णयासोबतच्या “परिशिष्ट-अ” मधील विवरणपत्रातील वस्त्रोद्योग घटकांस व्याज सवलत वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील वस्त्रोद्योग धोरण २०११ - २०१७ अंतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS शी निगडीत दिर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजनेअंतर्गत या शासन निर्णयासोबतच्या “परिशिष्ट-अ” मधील विवरणपत्रातील येथील वस्त्रोद्योग घटकांस एकूण रु.१,९०,८७,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी नव्वद लाख सत्याऐंशी हजार रूपये फक्त) इतकी रक्कम व्याज सवलतीपोटी मंजूर करुन वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. शासन निर्णयासोबतच्या रेमंड युको डेनीम, या वस्त्रोद्योग घटकाच्या बाबतीत, सदर प्रकल्पास दि.२३/०१/२०१७ रोजीच्या बैठकीत रू. २९९.३९ लक्ष व्याज अनुदान मंजूर करण्यात आले आहे. परंतु या प्रकल्पास यापुर्वी शासन निर्णय क्र.बैठक२०१५/प्र.क्र.१२७/टेक्स-५, दि. ८ जून, २०१५, अन्वये रू. १०८.५२ लाख इतकी रक्कम जादा प्रदान झाली आहे. त्यामुळे सदर जादा प्रदान झालेली रक्कम या प्रकल्पाच्या दि.२३/०१/२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर झालेल्या दाव्यामधून खालील प्रमाणे समायोजित करण्यात येत आहे.

प्रकल्पाचा तिमाहीचा दावा	तिमाही क्रमांक	दि.२३/०१/२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर रक्कम (लाख)	समायोजित करण्यात येणारी रक्कम	समायोजित रक्कम कमी करून उर्वरीत देय रक्कम (रू.लाखात)(३-४)
१.	२.	३.	४.	५.
०१/०४/२०१५ - ३०/०६/२०१५	५	७१.१	७१.१	०.००
०१/०७/२०१५ - ३०/०९/२०१५	६	७६.३९	३७.४२	३८.९७
०१/१०/२०१५ - ३१/१२/२०१५	७	७६.३९	०.००	७६.३९
०१/०१/२०१६ - ३१/०३/२०१६	८	७५.५१	०.००	७५.५१
एकुण		**२९९.३९**	**१०८.५२**	**१९०.८७**

वरील प्रमाणे सदर प्रकल्पास रू. २९९.३९ लक्ष इतके अनुदान मंजूर आहे. त्यापैकी रु. १०८.५२ जादा प्रदान रक्कम या प्रकल्पाच्या पुढील (अनुक्रमांक ५ ते ६) दाव्यातून कमी करून, या दाव्यांमधील उर्वरीत रू. १९०.८७ लाख इतकी रक्कम, सदर प्रकल्पास या शासन निर्णयाअन्वये अदा करण्यात येत आहे. सदरहू वस्त्रोद्योग घटकास वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या बँकेच्या खात्यावर R.T.G.S. द्वारे वितरीत करण्यात यावी.

३. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली व्याज सवलतीची रक्कम रु.१,९०,८७,०००/- परिशिष्ट अ मधील बँकेने या शासन निर्णयासोबतच्या “परिशिष्ट-अ”मधील त्यांच्याशी संबंधित वस्त्रोद्योग घटकाच्या कर्ज खात्यात जमा करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित बँकेस वितरीत करण्याकरीता श्री. र.गं.बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. दा.अं.कुलकर्णी, उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखाअधिकारी,कार्यालय, मुंबई येथून आहरीत करुन ती उपरोक्त बँकेस वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१ - ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (६४) केंद्र पुरस्कृत (TUF) योजनेशी संबंधित वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजासाठी अर्थसहाय्य योजना(कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य (२८५१ ५९८१) " या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ अन्वये, ३३ अर्थसहाय्य या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परीपत्रकातील परिछेद ६ ते १० पैकी ६ अ,२, ७ (१)(अ)(आ), ७(२),७(३), ७(४),७(५),७(६),७(७),७(८),७(९) या प्रकरणी लागु नाही. तसेच या परिपत्रकातील परिछेद ६ब, ६क, ८ व ९ मध्ये लागु असलेल्या अटींची तसेच या परिपत्रका सोबतच्या परिशिष्ठ मधील तपासणी सूचीप्रमाणे (अनुक्रमांक ८) सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

या शासन परिपत्रकातील परि.४ नुसार या योजनेखाली वितरीत करण्यात येणारा निधी, ७० % च्या मर्यादेत खर्च करण्यात येत आहे. व योजनेखाली निधी वितरीत करतांना परि. ५ नुसार करतांना कार्यवाही करण्यात येईल.

७. शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.१,२,५,६,७ सदर योजना ही नियमित राज्य योजनांतर्गत योजना असल्याने व “अर्थसहाय्य” या शिर्षाखाली अर्थसहाय्य वितरण असल्याने नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

८. शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.३ व ४ योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्ती मध्ये बदल होत नसल्याने नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

९. वित्त विभाग परीपत्रक क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दि.१०/०५/२०१६ च्या परिशिष्ट-**अ** मधील अनु.क्र.१ ते ९ संदर्भातील तपासणी सुची मधील याप्रकरणी लागु असलेल्या मुद्द्यांची पुर्तता होत आहे.सदर परीपत्रकानुसार परिशिष्ट-**अ** मधील अनु.क्र.१-९ संदर्भातील माहीती खालील प्रमाणे आहे :-

१) **विभागास प्रदान वित्तीय अधिकार :-** वित्त विभाग परीपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/४/२०१५ अन्वये ३३ अर्थसहाय्य या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परीपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

२) **मंजूर निधी :-**

" मागणी क्रमांक व्ही-२, २८५१ - ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (६४) केंद्र पुरस्कृत (TUF) योजनेशी संबंधित वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजासाठी अर्थसहाय्य योजना(कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य (२८५१ ५९८१) " या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी **रू. ८४३५.०० लक्ष** इतका निधी उपलब्ध झाला आहे. या अर्थसंकल्पीय तरतूदीमधील शिल्लक निधीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाख)

१.	सन २०१८-१९ साठी अर्थसंकल्पिय तरतूद	८४३५.००
२.	वित्त विभागाच्या आदेशानुसार खर्चासाठी ७० टक्के उपलब्ध निधी	५९०४.५०
३.	चालू आर्थिक वर्षात यापूर्वी वितरित/खर्च झालेला निधी	००.००
४.	खर्चासाठी उपलब्ध असलेला शिल्लक निधी (क्र. २-३)	५९०४.५०
५.	या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी	१९०.८७
६.	शिल्लक निधी	५७१३.६३

३) मागील ३ महिन्यापूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे :- होय

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे, त्या लेखाशिर्षाअंतर्गत १ वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :- या योजनेखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक त्याच लेखाशिर्षाखाली प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे :- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे:-लागू नाही

७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा :- लागू नाही.

८) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमीत करण्यापुर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत :- लागू नाही.

९) खरेदी विषयक प्रक्रीया अद्यावत संबंधीत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा :-लागू नाही.

१०. शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं -२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक २ एप्रिल,२०१८ च्या परिशिष्टातील अनु.क्र.८ संदर्भातील तपासणी सुची मधील याप्रकरणी लागु असलेल्या मुद्द्यांची पुर्तता होत आहे.सदर परीपत्रका सोबतच्या परिशिष्ठातील अनु.क्र.८ संदर्भातील माहीती खालील प्रमाणे आहे :-

१) योजनेस प्रशासकिय मान्यता - शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण- २०१२/ प्र.क्र.१/टेक्स-२, दिनांक १ मार्च, २०१२ नुसार योजनेस प्रशासकिय मान्यता आहे.

२) निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता झाल्यानंतरच होणार आहे.- शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता होत आहे.

३) यापूर्वी वितरीत केलेल्या ७५ % निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र- संबंधित वस्त्रोद्योग घटकांना यापुर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे

४) यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत :- सद्य:स्थितीत नाहीत.

५) निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होणार आहे :- सदर योजने अंतर्गत योजनेतील तरतुदीनूसार निधी बँकांच्या खात्यात जमा होऊन तदनंतर लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केला जातो.

६) वस्तु खरेदी करण्यापुर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र:-लागू नाही.

७) यामधून खरेदी करण्यापुर्वी खरेदी असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयके अदा केले जाणार आहे. :- लागू नाही.

८) आवश्यक त्या ठिकाणी आदीवासी सामाजिक न्याय यांची निधी वितरणास सहमती आहे :-लागू नाही.

९) प्रस्तूत योजनेत संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :- कुठलेही देयक प्रलंबित नाही.

१०) निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे - होय.

११. सदर शासन निर्णय, संदर्भिय अ.क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये मा.प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि. २१-०१-२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मुख्य विषयसुचीमधील वस्त्रोद्योग प्रकल्पांच्या दाव्यांना मिळालेल्या मान्यतेनुसार तसेच संदर्भ क्र. ८ येथील शासन निर्णयाअन्वये प्राप्त झालेल्या अधिकारातून निर्गमित करण्यात येत आहे.

१२ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१२१६१६०८७२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashish
Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c,
serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.04.12 16:19:08 +05'30'

(आशिष लोपिस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर

२.महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर

३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५. अ.मु.स. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई(ई-मेलद्वारे)
६.अ.मु.स. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई(ई-मेलद्वारे)
७.सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई.(ई-मेलद्वारे)
८.संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.(ई-मेलद्वारे)
९.उप सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
१०.अवर सचिव (१७-स), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
११.कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
१२.प्रवर्तक, परिशिष्ट अ मधील वस्त्रोद्योग घटक (ई-मेल व्दारे)
१३.परिशिष्ट अ मधील बँका (टफ सेल) (ई-मेल व्दारे)
१४. निवड नस्ती (टेक्स-५).

शासन निर्णय, क्रमांक: बैठक - २०१६/प्र.क्र.७९१/टेक्स-५ दि. १२ एप्रिल, २०१८ चे सहपत्र

परिशिष्ट “अ”

Bank Sr.No : 1			
Bank Name:	State Bank of India	Account Number :	32711319625
Account Name :	Tufs subsidy (maharashtra government)	IFSC Code:	SBIN0011688
Total Amount (Rs. in lakhs):190.87			

Unit Sr.No	:	1
Unit UID No and Name	:	D/2015/10033 - RAYMOND UCO DENIM PVT LTD

Claim Details of Delinked : D/2015/10033

Claim Period	Claim No	Amount of interest subsidy approved by
01/04/2015 - 30/06/2015	5	00
01/07/2015 - 30/09/2015	6	38.97
01/10/2015 - 31/12/2015	7	76.39
01/01/2016 - 31/03/2016	8	75.51
-	Total	190.87